# Positive Story of Nagpur Rural Police

**दिनांक ०९/०४/२०२५**

**उष्माघातापासुन पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्या संरक्षणाकरीता मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांचा नाविन्यपुर्ण उपक्रम**

सध्या उन्हाळा सुरू झाला असुन पोलीसांना त्यांचे कर्तव्य बजावतांना कित्येक तास उन्हात फिराव लागते किंवा उभे राहव लागते.यामुळे त्यांच्या आरोग्यावर प्रभाव पडण्याची शक्यता आहे. ही बाब गंभीर असुन याची दखल मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी घेवुन नाविन्यपुर्ण उपक्रम राबवुन त्या साठी उपयोजना करण्याबाबत सर्व पोलीस स्टेशन आणि शाखा प्रभारी अधिकारी यांना खालील प्रमाणे सुचाना दिल्या आहे.

१.प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या करीता नेहमी केळी उपलब्ध राहतील अशी व्यवस्था करावी.

२.कर्तव्य बजावतांना उन्हाच्या प्रभावामुळे प्रकृती खालावुन अशक्तपणा आल्यास त्यांना त्वरीत देण्यासाठी इलेक्टॉल पावडर व ओआरएस नेहमी उपलब्ध राहतील अशी व्यवस्था करावी.

३.प्रत्येक दिवशी सकाळी हजेरीवर पोलीस अधिकारी/अंमलदार यांना कर्तव्यावर पाठविण्यापुर्वी त्यांनी नाश्ता केला किंवा कसे याबाबत विचारपुस करून खात्री करावी.

४.उसाचा रस आणि नारळ पाणी विक्रेत्यांना पोलीस स्टेशनचे जवळचउपलब्ध ठेवावे.

मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी वरील प्रमाणे सुचना निर्गमित करून तात्काळ दिलेल्या सुचनांची पुर्तता करण्याबाबत प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे. तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व अधिकारी आणि अंमलदार यांना उन्हापासुन स्वत:ची काळजी घेवुन सुरक्षीतता बाळगुन कर्तव्य करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.